गायरान जमिनी विविध प्रयोजनासाठी
मंजूर करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक: एलएनडी-१०९५/प्र.क्र.९८/९५/ज-१,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.

दिनांक:- १८ डिसेंबर १९९५.

पहावे. : शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक जीआरएस-१०७८/२६१६/७७७/ग-६, दिनांक २६ मार्च १९८४.

## परिपत्रक

गायरान जमिनीच्या वापराच्या संदर्भात शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक जीआरएस-१०७८/२६१६/७७७/ग-६, दिनांक २६ मार्च १९८४ प्रमाणे उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारशींना शासनाने मान्यता दिलेली आहे. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी गायरान जमिनी मंजूर करण्याविषयी जिल्हाधिका-यांकडून शासनाकडे सादर होणा-या प्रस्तावामध्ये ब-याच त्रुटी आढळून येतात ~~आल्या आहेत~~. ह्या त्रुटी ढोबळ मानाने खालील प्रमाणे आहेत.

अ] गायरान जमिनीतून जमीन देण्यासाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात जिल्हाधिकारी यांनी संबंधीत गावातील एकुण गायरान जमिनीचे क्षेत्र व प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र याचा स्पष्ट तपशील द्यावा. तसेच गावातील गायरान जमिनीचे एकूण क्षेत्र व लागवडीखालील एकूण क्षेत्र याचा तपशील दिलेला नसतो.

ब] गायरान जमिनीसंबंधी ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत व त्या ठरावातील भूमिका व ग्रामपंचायतीचे मत याचा सुस्पष्ट आढावा जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावात अंतर्भूत असत नाही.

क] जिल्हाधिका-यांनी गायरान जमिनीसंबंधीचे प्रस्ताव पाठविताना केवळ गुरांच्या संख्येनुसार प्रस्तावाचे समर्थन न करता मागणी करण्यात आलेल्या प्रयोजनासाठी विशिष्ट गायरान जमीनच का आवश्यक आहे याचे सुस्पष्ट समर्थन दिलेले नसते.

30 DEC 1995

तेव्हा सर्व जिल्हाधिकारी यांना असे निदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी गायरान जमिनी निरनिराळ्या प्रयोजनासाठी मंजूर करण्याविषयीच्या

..२/-

प्रस्तावामध्ये वरील सर्व मुद्यांचा परामर्श घेऊन त्यांनी प्रस्ताव आवश्यकतेनुसार शासनाकडे सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ क. ओ. चिरशीद ]

उप सचिव,

महसूल व वन विभाग,

महाराष्ट्र शासन.